# गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि.५ महाराष्ट्र अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर,२०११ रोजी स्थापित राज विद्यापीठ)

## (क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग )

ऑफीस नं.०७१३२– २२३१०९ मो.नं. ९८५०३८८५७०

क्रमांक /क्रीशाशिवि/गो.वी/१७१८/२०१५ दिनांक : १६ /११/२०१५

अतिमहत्वाचे

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नीत महाविद्यालय,
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली.

विषय :– क्रीडा महोत्सव – २०१५ चे सराव शिबीर जिल्हा क्रीडा संकुल,चंद्रपूर येथे आयोजनाबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येत आहे की, महाराष्ट्र राज्य क्रीडा महोत्सव २०१५ चे आयोजन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड येथे दिनांक २७ नोव्हेंबर ते ०१ डिसेंबर या कालावधीत आहे. हया क्रीडा महोत्सवात भाग घेणाऱ्या खेळाडूंनी व प्रशिक्षक,संघव्यवस्थापकांनी खालील बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

१) सर्व खेळांडूनी दिनांक २१/११/२०१५ ला ठिक ४.०० वाजेपर्यंत जिल्हा क्रीडा संकुल,चंद्रपूर येथे उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

२) दिनांक २५/११/२०१५ ला सकाळी ४.०० वाजता चंद्रपूर येथून नांदेडकरीता संघ रवाना होतील.

३) सर्व खेळाडुंनी सोबत चादर,ब्लॅकेट,स्वेटर, इतर आवश्यक साहित्य आणावे. कोणत्याही खेळाडूंना घरी जाण्याची परवानगी मिळणार नाही.

४) निवास व्यवस्था गुरूद्वारा बोर्डाच्या यात्री निवास येथे केली असल्यामुळे गुरूद्वारा परिसरात मध्यपान,धुम्रपान,तंबाखु सेवन अथवा बाळगणे,गणी वाजवणे,शिटी वाजवीने,गोंधळ घालणे, डोक्यावर रूमाल,फेटा,टोपी असणे बंधनकारक आहे. हया बाबतीत सर्व खेळाडूंनी हमीपत्र भरून देणे आवश्यक आहे.

५) क्रीडा महोत्सवात कबड्डी व खो–खो हया स्पर्धा मॅटवर घेण्याचे ठरले असल्याने संबंधीत खेळाडूंनी मॅटवरील शुज (बुट) सोबत आणावे.

६) पथसंचालनात सर्व खेळाडूंनी भाग घेण्याकरीता शुज (बुट) असणे आवश्यक आहे.

करीता सर्व संबधीत खेळाडूंना व प्रशिक्षक,संघव्यवस्थापक यांना माहितीस्तव कळविण्याची कृपा करावी.

(प्रा. एस.व्ही.कोहळे)
संचालक
क्रीडा व शारिरीक शिक्षण विभाग
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली.

GONDWANA UNIVERSITY GADCHIROLI (M.S.) PHYSICAL EDUC DEPARTMEN